आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२४
ठळक बातम्या

1. विविध मुद्यांवर विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळं संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज चौथ्या दिवशी दिवसभरासाठी तहकूब.
2. ५५व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात लिथुआनियन चित्रपट 'टॉक्सिक' ने पटकावला सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा सुवर्ण मयूर पुरस्कार.
3. गोंदिया सडक अर्जुनी मार्गावर शिवशाही बसला झालेल्या अपघातात ११ प्रवाश्यांचा मृत्यू तर सुमारे ३२ प्रवासी जखमी, पंतप्रधान मोदी यांनी जाहीर केली सानुग्रह मदत.

आणि

4. डाक विभागातर्फे उद्या पर्यन्त जीपीओच्या सभागृहात 'नागपूर पेक्स-२०२४' या फिलाटेली अर्थात पत्रव्यवहार प्रदर्शनाचं आयोजन.

आता सविस्तर बातम्या .......

संसद तहकुब

अदानी लाच प्रकरणासह इतर मुद्यांबाबत विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळं संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात आजही अडथळे निर्माण झाले. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज चौथ्या दिवशी दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेचं कामकाज सुरु होताच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अदानी लाच प्रकरणाबाबत गदारोळ सुरु केला. विरोधी पक्षांनी घातलेल्या गोंधळामुळं राज्यसभेचं कामकाज अपेक्षेप्रमाणे होत नसल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यसभेचं कामकाज ठप्प झाल्यानं वेळेचा अपव्यय तसंच सामान्य जनतेच्या समस्यांची हेळसांड होत असल्याबाबत नाराजी व्यक्त करून धनखड यांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. राज्यसभेच्या अधिवेशनाचं पुढचं सत्र आता २ डिसेंबरला होणार आहे. लोकसभेचं कामकाज सुरू होताच काँग्रेस, डीएमके आणि समाजवादी पार्टीच्या खासदारांनी जोरदार घोषणाबाजी सुरु केली. या गदारोळातही सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराच्या तासावरची चर्चा सुरु ठेवली. मात्र विरोधी पक्षाच्या सदस्यांनी दाद न दिल्यामुळे बिर्ला यांनी अखेर लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

नाना पटोले

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतांच्या टक्केवारीतील तफावत गंभीर आणि चिंताजनक प्रकार आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदान झाले, त्याच रात्री ११.३० वाजता ते ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी हेच मतदान ६६.०५ टक्के झाल्याचं सांगितलं, यात एकूण ७.८३ टक्के वाढ झाल्याचं स्पष्ट दिसत आहे. तब्बल ७६ लाख मतांची ही वाढ असून मतदानाचा टक्का कसा वाढला? असा प्रश्न उपस्थित करून निवडणूक आयोगानं जिथं मतदान वाढलं त्या केंद्राचे व्हिडीओ फुटेज जाहीर करावे अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले

यांनी केली आहे. प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षाच्या विधानसभा उमेदवारांची बैठक टिळक भवन इथं पार पडली. या बैठकीला माजी मंत्री बाळासाहेब थोरात, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, माजी मंत्री के.सी.पाडवी, यशोमती ठाकूर, डॉ.विश्वजीत कदम, आदी नेते उपस्थित होते. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले यांनी मतांची आकडेवारी देत निवडणूक आयोगाच्या कारभारावार प्रश्न चिन्ह उपस्थित केले. मतदानाच्या दिवशी ५ वाजल्यानंतर मतांची टक्केवारी वाढल्याचे प्रमाण पाहता मतदारकेंद्रावर लांबच लांब रांगा लागल्या असल्या पाहिजेत. राज्यातील किती मतदार संघावर अशा रांगा लागल्या होत्या ते निवडणूक आयोगाने पुराव्यासह दाखवावे, निवडणूक आयोगाने मतदान केंद्रावर **CCTV** लावले होते, त्याचे चित्रिकरण दाखवावे अशी मागणी पटोले यांनी केली आहे.

सुधीर मुनगंटीवार

ईव्हीएम विरोधातील काँग्रेसचे आरोप आणि आंदोलनाचा इशारा हास्यास्पद असल्याची टीका भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. ईव्हीएमवरून आंदोलनाचा इशारा देण्यापूर्वी महाराष्ट्रासह देशभरातील विविध निवडणुकांत विजयी झालेल्या लोकप्रतिनिधींनी राजीनामा द्यायला हवा. त्यानंतरच, काँग्रेस नेते ईव्हीएमबाबत गंभीर असल्याचे मानले जाईल. मुळात देशात ईव्हीएमवर निवडणुका घेण्याचा निर्णय काँग्रेस सरकारच्या काळात झाला. ईव्हीएमची खरेदीही काँग्रेस सरकारच्या काळातच झाल्याचे मुनगंटीवार म्हणाले. दरम्यान, विधानसभा निवडणुकांच्या निकालांना पाच दिवस उलटूनही सरकारचा शपथविधी होत नसल्याच्या प्रश्नावर 'मागील वीस वर्षात सर्वात कमी दिवसात होणारा शपथविधी या सरकारचा असेल' असं उत्तर त्यांनी दिलं.

बच्चू कडू

येणारा काळ हा संघर्षाचा असून जातीधर्माच्या राजकारणात आपल्याला सेवा आणि मुद्द्याचे राजकारण समोर आणायचे आहे. धर्म, जात, सत्ता, पैसा या राजकीय स्थितीमध्ये संघर्ष, सेवा, नियोजन आणि त्यागाची भावना ठेवून आपण जनसेवेची लढाई लढणार असं प्रतिपादन प्रहारचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी केलं . राज्यातील विधानसभा निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर प्रहार जनशक्ती पक्षाची चिंतन बैठक बच्चू कडू यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या ठिकाणी पार पडली.या बैठकीला संबोधित करत असतांना ते बोलत होते.

वक्फ बोर्ड

राज्यात काळजीवाहू सरकार असताना वक्फ बोर्डाला निधी देण्यासंदर्भात प्रशासनाने **GR** काढण्याचा प्रकार योग्य नसल्याने मुख्य सचिवांनी तत्काळ तो आदेश मागे घेतला आहे. राज्यात नवीन सरकार येताच याचे औचित्य आणि नियमाधीनता याची चौकशी केली जाईल, असं उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी समाजमाध्यमवरील संदेशात म्हटलं आहे.

पर्यटन

केंद्र सरकारने देशातल्या प्रसिद्ध पर्यटन स्थळांना जागतिक मानकांच्या नुसार विकसित करण्यासाठी सुमारे तीन हजार ३०० कोटी रुपयांच्या ४० योजनांना मंजुरी दिली आहे. २३ राज्यातल्या या योजनांसाठी राज्यांना विशेष मदत दिली जाईल, ज्यावर पुढचे ५० वर्ष कोणतंही व्याज आकारलं जाणार नाही. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हयात जलसंग्रहालय, कृत्रिम प्रवाळ निर्मिती प्रकल्पासाठी ४६ कोटी रुपये, तर नाशिक इथं रामकाल मार्गासाठी ९९ कोटी रुपये मंजुर करण्यात आले आहेत. पर्यटनामध्ये अनेकांच्या जीवनात समृद्धी आणण्याची क्षमता असून, सरकार देशात

पर्यटन पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर देत राहील, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

इफी समारोप

५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इफ्फीचा काल गोव्यात समारोप झाला. नऊ दिवस चाललेल्या या महोत्सवात ७५ देशांमधले २०० हून अधिक चित्रपट दाखवण्यात आले. समारोप सोहळ्यात ऑस्ट्रेलियातले दिग्गज चित्रपट निर्माते फिलिप नॉय्स यांचा सत्यजीत रे जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. लिथुआनियन चित्रपट 'टॉक्सिक' ने इफ्फीचा सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा सुवर्ण मयूर पुरस्कार पटकावला. तर रोमानियन दिग्दर्शक बोगदान मुरेसानु यांनी 'द न्यू इयर दॅट नेव्हर केम' साठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा रौप्य मयूर पुरस्कार पटकावला. क्लिमेंट फाव्यू यांना 'होली काऊ' या फ्रेंच चित्रपटातील गुंगवून टाकणाऱ्या व्यक्तिरेखेतील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. तर व्हेस्टा मॅटलाईट आणि लेवा रुपीकायटे या दोघींना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला. “मरीजा आणि क्रिस्टीना ही अविस्मरणीय पात्रे रंगवण्यासाठी स्वतःच्या शारीरिक तसेच भावनिक मर्यादेची परीक्षा पाहणाऱ्या व्हेस्टा मॅटलाईट आणि लेवा रुपीकायटे या अभिनेत्रींच्या पदार्पणातील असामान्य अभिनयासाठी” या पुरस्कार देण्यात आला. चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दल प्रतिष्ठित भारतीय दिग्दर्शक रमेश सिप्पी आणि अभिनेत्री जयाप्रदा यांचा विशेष सत्कार करण्यात आला. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यावेळी उपस्थित होते.

अपघात

आज सकाळी भंडारा आगारातून निघालेली शिवशाही बस गोंदिया सडक अर्जुनी मार्गावरील बिंद्रावन टोला गावाजवळ अनियंत्रीत झाल्याने रस्त्याच्या बाजूने उलटून झालेल्या अपघातात आता पर्यंत ११ प्रवाश्यांचा मृत्यू झाला आहे. तर सुमारे ३२ लोक जखमी असुन त्यांना गोंदिया जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आलं आहे. हा अपघात इतका भीषण होता की मृतकांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान मृतांसाठी शोक व्यक्त करतानाच मृतांच्या कुटुंबीयांना एसटी महामंडळामार्फत **10** लाख रुपयांची मदत देण्यात येईल, असं काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलं आहे. या घटनेत जखमी झालेल्यांना खाजगी रुग्णालयात उपचार देण्याचे आणि आवश्यकता भासल्यास त्यांना नागपूरला हलविण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश काळजीवाहू उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी गोंदियाच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील आपघातबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख तर जखमीना ५० हजारांची सानुग्रह मदत जाहीर केली आहे.

'मेरा युवा भारत: वतन को जानो'

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या 'मेरा युवा भारत : वतन को जानो' कार्यक्रमांतर्गत मुंबई भेटीवर आलेल्या काश्मीरच्या १२५ युवक युवतींनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची आज राजभवन मुंबई इथं भेट घेऊन संवाद साधला. नेहरू युवा केंद्र संघटन संस्थेतर्फे या मुंबई भेटीचं आयोजन करण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री पीक विमा

प्रधानमंत्री पीक विमा योजना-रब्बी **2024'** मध्ये कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होण्याचं आवाहन, नागपूर विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे यांनी केलं आहे. ज्वारी पिकासाठी **30** नोव्हेंबर पर्यंत, तर गहू बागायत आणि हरभरा पिकासाठी **15** डिसेंबर पर्यंत सहभागी होता येणार आहे.

धान्य आवक

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत काल मका आणि सोयाबीन या धान्याची सुमारे ६० हजार पोत्यांची आवक झाल्याने बाजार समितीचे मुख्य आवार पूर्णत: धान्याच्या थप्पीने भरून गेले होते. त्यामुळे टीएमसी यार्डवर हे धान्य ठेवावे लागले. धान्याची प्रचंड आवक झाल्याने अचलपूर बाजार समिती प्रशासनाला बाजार समितीतील धान्य खरेदी विक्रीचे व्यवहार तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा लागला.

डाक प्रदर्शन

भारतीय डाक विभागातर्फे आज आणि उद्या जीपीओच्या राजहंस सभागृहात सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत 'नागपूर पेक्स-२०२४' या जिल्हास्तरीय फिलाटेली अर्थात पत्रव्यवहार प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. डाक विभागातर्फे विद्यार्थी तसेच नागरिकांकरिता चित्रकला स्पर्धा तसेच क्विज स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या जिल्हास्तरीय टपाल तिकीट प्रदर्शनीचं आज उदघाटन पोस्ट मास्टर जनरल शोभा मधाळे, राष्ट्रीय रक्षा उत्पादन अकादमी नागपूरचे मुख्य महाप्रबंधक डॉ.जे.पी.दास यांच्या हस्ते करण्यात आलं. दोन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनीमध्ये जुने पोस्टाचे तिकीट, लिफाफे, कार्ड, मेघदूत पोस्ट कार्डसह अनेक जुन्या वस्तूचे संग्रह ठेवण्यात आलेले आहे.

हवामान

विदर्भात सर्वात कमी **10. 9** अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद गोंदिया जिल्ह्यात करण्यात आली, त्या पाठोपाठ बुलढाणा इथं बारा पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तर वर्धा येथे बारा पूर्णांक नऊ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदवण्यात आलं. नागपुरी इथं तेरा पूर्णांक दोन अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद गेल्या **24** तासात करण्यात आली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान **13** अंश सेल्सिअस ते **14** अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

******